

मलिका मा अझमा महाराणी साहेब व्हिक्टोरिया यांचा जयजयकार असो.

किंमत ६४ आणे.

[illegible]


[illegible]

[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

[illegible]

मलिका माअज्जमा महाराणी साहेब
व्हिक्टोरिया





मलिका मा अज्ञमा महाराणी साहेब व्हिक्टोरिया यांचा जयजयकार असो.

राणीगीत.

हें लहानसेंच, पण अत्युत्तम नीतिपर पुस्तक

गोविंद पांडुरंग टिळक स्कूल मास्तर मुलींची
शाळा हातकणंगलें, पेटा आळतें, इ० कोल्हापूर,

यानें तयार करून

कोल्हापूर येथें
ज्ञानसागर छापखान्यांत छापिलें.

सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी.

सन १८९७ इ०

किंमत चार आणे.

सूचना.

ह्या पुस्तकांत चक्रवर्तिनी श्रीमति महाराणी साहेब व्हिक्टोरिया केसर इ हिंद यांची स्तुति, आणि त्यांस दीर्घायुषी करण्याबद्दल परमेश्वरापाशीं विनयपूर्वक मागणें मागून, महाराणी साहेबांच्या कारकीर्दीतील राज्य पद्धतीचे धोरणा विषयीं माहिती थोडक्यांत दिलेली आहे. म्हणून-

खचित् खचित् या महत् समाधानकारक पुस्तकाची योग्यता कितपत आहे, याची कल्पना सुध्दां माझ्यानें करवत नाहीं. तथापि मी इतकेंच लिहितों कीं, प्रस्तुत ईश्वरी संकेतानें जिच्या सत्तेखालीं आपण आहों, जिची कृपा आपणांवर आहे, जी आपणांवर सदोदित प्रीति करिते, आणि जिची ख्याति दिगंतरीं आहे. अशा या आमच्या अन्नदात्या परम दयाळू मालिका मा-

अक्षमा व्हिक्टोरिया महाराणी साहेब यांच्या नांवानें आम्ही निरंतर गाणीं गावींत, हें इष्ट आहे. ह्यासाठीं आम्हां सर्व प्रजाजनांच्या संग्रहीं असावें, अशा हेतूनें थोड्याशा श्रमानें मी हें लहानसें पुस्तक तयार केलें असून याचा फायदा सर्वत्र अबालवृध्द करून घेतील अशी आशा आहे.

मेहरबान व्हिट्कोम साहेब बहादूर, असि॰ सुप्रिंटेंडेन्ट रेव्हिन्युसर्वे मराठास्टेट यांणीं आरंभीं रुकडी मुक्कामीं, आपला अमोल्य वेळ खर्च करून, या बुकांतील पहिल्या आवृत्तीच्या सर्व कविता मजकडून म्हणवून घेतल्या, आणि मोठ्या आनंदानें ह्याबुकाच्या पहिल्या आवृत्तीच्या कांहीं प्रतींना आगाऊ आश्रय देऊन, कांहीं सुधारणा करण्यास सांगितल्या, तेणें करून मजला चालू कामास भारी उमेद आली.

करितां मी साहेब बहादुरांचा, आणि पहिल्या आवृत्तीस उदार आश्रय दिलेल्या इतर सद्गृहस्थांचा मी फार फार आभारी व ऋणि आहे.

हातकणंगलें, तारीख १० } गो. पां. टिळक,
आक्टोबर सन १८९७ इ० } पुस्तककर्ता.

ह्या बुकांत समावेश केलेल्या कवितेंचा तपशील.

येणें प्रमाणें पंचेचाळीस कवितेंचा समावेश अन्वयार्थासह केला आहे.

मलिका माअझमा महाराणी साहेब व्हिक्टोरिया यांचा जयजयकार असो.



राणीगीत.



नमन

आरंभीं मनांत आणिलेला हेतु निर्विघ्नपणें तडीस जाण्याकरितां सकलगुणसंपन्न बुध्दिदाता जो परमेश्वर त्याचे पदीं नम्र होऊन मी माझे कामास लागतों.

शार्दूलविक्रीडित

एकोणीस पहा अधीक अठरा शें यांत जी
जन्मली ॥
नामातें इहलोकिं घी सुसमयीं व्हिक्टोरि-

या पावली[१३]॥
आनंदें[१४] अठरावरी[१५] सदातेंझीं[१६] सिंहासनीं[१७]
बैसली[१८] ॥
ती[२१] ही[२२] राणि[२३] अम्हां[२०] असे[२८] बहु[२६] जशी[२४] छ-
त्राचि[२५] बा[१९] सावली[२७]॥१

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- पहा, या मृत्युलोकीं जिचा जन्म इ० सन १८१९ त झाला, जिनें सुमुहूर्तावर आपल्यास व्हिक्टोरिया असें नांव धारण केलें, व आनंदानें इ०स०१८३७ त सिंहासनारूढ झाली, बाप हो, ती ही व्हिक्टोरिया महाराणी ज्याप्रमाणें छत्रीची छाया सुखकारक असते त्याप्रमाणें आम्हां प्रजाजनांला सुख देणारी आहे.

शार्दूलविक्रीडित.

इंग्लंदीं[२] असुनी[३] जिचा[४] मुखवटा[५] नाण्यांवरी[६]

साजतो ॥

[८]जीचा [११]धाक [९]रिपूंस [१०]फार [१२]म्हणुनी [१४]डंका

[१३]जगीं [१५]गाजतो ॥

[१७]चंद्राची [१८]प्रतिमा [१९]करून [१६]विधिनें [२०]सृष्टीम-

धें [२१]निर्मिली ॥

[१]जी [२६]राणी [२४]करिते [२२]प्रजेवरि [२३]कृपा [२५]ती [२८]पाहि-

जे [२७]गाइली ॥ २

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- जी इंग्लंदामध्यें राहत असून जिचा मुखवटा नाण्यावर शोभतो आहे, जिची शत्रूला अतिशय भीति आहे. म्हणून (जिच्या शूरपणाबद्दल) जिचा डंका जगांत गाजतो आहे. जी ब्रम्हदेवानें चंद्राची हुबेहुब नक्कल करून जगामध्यें उत्पन्न केली. जी आपल्या प्रजेवर दया करिते त्या आमच्या व्हिक्टोरिया राणी साहेब यांची आम्ही

सर्व प्रजाजनांनीं सदोदित कीर्ति गाइली पाहिजे.

दिंडी

तुष्ट[४] जीणें[१] राखिली[५] प्रजा[३] आजी[२] ॥
ज्ञान प्राप्तीनें[६] धन्य[८] जगामाजीं[७] ॥
कैशी[१२] झाली[१३] लोकांस[९] सौख्य[१०] द्याया[११] ॥
हस्त[१७] ठेवी[१८] बा[१४] शिरीं[१६] देवराया[१५] ॥ ३॥

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- जिणें सांप्रतकाळीं आपली प्रजा संतुष्ट राखिलेली आहे, जी अकलेनें जगामध्यें धन्य झालेली आहे, जी आम्हां प्रजाजनांना सुख देण्याकरितां निर्माण झाली, हे परमेश्वरा, अशी जी आमची स्वामिनी व्हिक्टोरिया इचे मस्तकावर हात ठेवून तिला वरप्रदान दे.

वसंत तिलका.

जाणा तुम्हीं च[१] अपुल्या[२] प्रिये स्वामिनीला[४] ॥

[९]वृत्ती [१०]कधींहि [११]नढळो [७]गुण [८]जाणण्याला ॥
[१३]ऐसें [१४]रहाल [१२]जरि [१७]कोण [१६]तुम्हां [१८]पुसेल ॥
[१९]मोठा [२०]प्रचंड [१५]तरि [२१]तोहि [२२]उगा [२३]बसेल ॥ ४ ॥

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- बाप हो, तुम्ही आपल्यावर प्रीति करणाऱ्या जगन्मातेला ओळखाव. तिचे गुणानुवाद गाण्याविषयींचें कर्तव्य कर्म कधीं ही ढळूं देऊं नका. जर ह्याप्रमाणें वागाल तर तुम्हाला कोण विचारील? कोणीही विचारणारा नाहीं. जरी अतिघोर विघ्न कर्ता असला तरी तो सुध्दां स्वस्थ राहील.

कामदा छंद.

(खेळ चांगला या चालीवर.)

[३]बोलती [१]जिला [२]सार्वभौमिनी ॥
[१०]चालती [९]पुढें [४]दोंहि [५]बाजुंनीं ॥
[६]भालेदार [७]नीं [८]चोपदारही ॥

आमुचे[12] हरी[14] दुःखभार[13] ही[11] ॥५

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- लोक जिला सार्वभौम राणी असें बोलतात. जिच्या दोन्ही बाजूंला भालदार आणि चोपदार चालतात. अशी ती महाराणी आमचें दुःख नाहींसें करी.

कामदा छंद.

(खेळ चांगला या चालीवर.)

भार[1] वाहुनी[2] फार[3] कष्टली[4] ॥
सौख्य[5] द्यावया[6] आतुर[7] जाहली ॥
त्या[13] तिच्या[14] करी[17] दूर[16] यातना[15] ॥
हे[9] दयानिधे[10] तूं[12] कृपाघना[11] ॥६॥

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- आम्हां प्रजाजनांच्या दुःखांचीं ओझीं वाहून जिला पुष्कळ श्रम झालेले आहेत, व जी

आम्हांस सुख देण्याकरितां उतावळी झाली आहे, त्या महाराणी साहेबांचीं हे परमेश्वरा, तूं तीं सर्व दुःखें नाहींतशीं कर.

आर्या.

अन्यायानें[२] वर्तति[३] त्यांशीं[४] शासन[५] करी[६] सदाकाळीं[१०] ॥
न्यायें[७] जें[१] वागति[८] त्यां[९] प्रीतीनें[११] देउनी[१२] सुखें[१३] पाळी[१४] ॥ ७

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- जे लोक अनीतीनें वागतात त्यांना राणी सरकार शिक्षा करिते, आणिजे लोक नीतीनें वागतात त्यांना सदोदित प्रीतीनें सुख देऊन त्यांचें पोषण करिते.

आर्या.

परम[२] समर्था[३] देवा[४] देई[८] इतकीच[६] देणगी[७]

लोकां ॥
राणी करो निरंतर राज्य, नसो बा क-
दापिही धोका ॥ ८

(वरील अंक अन्वयाचे आहेत)

अर्थ- हे समर्था देवा, लोकांना इतकेंच देणें दे कीं, राणीनें सर्वदा राज्य करावें. तिच्या राज्यास केव्हांही भीति नसावी.

आर्या.

नांदत असे महीवरि तेजाची शुभ्र चां-
दणी शोभे ॥
जी ती असो अखंडित आयुष्यें हेंचि
मागतों लोभें ॥ ९

(वरील अंक अन्वयाचे आहेत)

अर्थ- देवा, जिचें तेज चांदणी प्रमाणें प्र-

काशमान असून पृथ्वीवर नांदत आहे त्या महाराणीला पुष्कळ आयुष्य असावें लोभानें हेंच मागणें मागतों.

साक्या

अती कृपाळू नम्र असे जों तुमचे पायीं तिजला ।।
नाम जियेचें फार चांगलें व्हिक्टोरिया हिजला ।।
देई गति नामी ।। प्रीती विनवितसों आम्ही ।। १०
प्रभो दयाळा दीर्घ आयुषीं करुनी आम्हां देई ।।
तोष आणखी दुजे नको बहु लीन होतसों पायीं ।।
सौख्य अम्हां झालें ।। तैसें कोणि नसें दिधलें ।। ११

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ - जिचें फार चांगलें नांव व्हिक्टोरिया असें आहे जी पुष्कळ ममताळू असून परमेश्वरा, तुमचे पायाचे ठिकाणीं नम्र (लीन) झालेली आहे,

तिला उत्तम प्रकारची गति दे. याबद्दल आम्ही प्रेमळ अंतःकरणानें तुझी विनवणी करितों. हे सख्या दयाळू परमेश्वरा, महाराणी साहेबांना पुष्कळ आयुष्य देऊन आम्हां प्रजाजनांना संतोषित कर. या शिवाय दुसरी मोठी देणगी आम्हांला नको. तुम्हाला नमस्कार करितों. आम्हां प्रजेला महाराणी साहेबांचे कारकीर्दीत जसें सुख मिळालें तसें आजपर्यंत कोणाच्याही कारकीर्दीत मिळालेलें नाहीं.

शार्दूलविक्रीडित.

कीर्तीनें[3] भरली[4] तशीच[5] सरली[8] नाहींच[9] कीं[10] बापुडी[2] ॥
देण्याला[7] पदव्या[6] निकोल[13] करितें[14] जी[1] आमुची[11] सांकडीं[12] ॥
गर्वानें[15] थिजली[16] असोनि[17] विजली[20] शोभे[21]

जैशी पृथ्वीला ॥
देवा धांवे कृपा अम्हांवर करीं आयुष्य
दे तीजला ॥१२

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- जी बिचारी सुकीर्तीनें भरलेली आहे. त्या प्रमाणेंच मोठ मोठे हुद्दे देण्याला मागें सरत नाहीं. आम्हांला संकटांतून मुक्त करिते. जी निगर्वी असून पृथ्वीला विजेप्रमाणें शोभा देत आहे. देवा धांव आम्हांवर कृपा कर. आणि महाराणी साहेबांना पुष्कळ आयुष्य दे.

पृथ्वी

महत्व असुनी जिला जगतिं लोक वाखाणिती ॥
असे स्वरुपिं गोमटी परम अप्सरेतुल्य ती ॥
अजिंक्यपद मेळवी म्हणुनि शत्रु ते पाहुनी ॥
पदां शरण जाति बा रखवित आमुची स्वामिनी ॥१३

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- जी जगतांत मानानें मोठी असून जिची लोक वाखाणणी करितात, जी स्वरूपानें अप्सरेप्रमाणें गोरी गोमटी सुंदर अशी आहे, जिनें अजिंक्यपद संपादन केलेलें पाहून जिला शत्रु शरण जातात. बापहो, तीच खचित् आमची पालन करणारी महाराणी व्हिक्टोरिया होय.

दिंडी

अशी[10] माऊली[11] दुजी[12] कोण[13] आहे[14] ।।
सौम्य[6] मुद्रेनें अम्हांकडे[8] पाहे[9] ।।
सुशील[2] भारी[1] सत्यंव्य[5] जिच्या[3] ठायीं[4] ।।
देई[19] तिजला[16] अढळत्व[18] प्रभू[15] पायीं[17] ।।१४

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- जिचा स्वभाव अतिशय उत्तम असून जिच्या ठायीं खरेपणाची वस्ति आहे. जी आम्हां-

कडे कोमल दृष्टीनें पहाते अशी दुसरी कोण माउ-
ली आहे? ईश्वरा, अशा त्या महाराणीला आप-
ल्या पायाचे ठिकाणीं अढळपद दे.

शिखरिणी.

जिच्या पोटीं झालीं असतिं नउ बाळें बहुगुणी॥
परी दैवें आजीं जगतिं उरलीं सात सुगुणी॥
जिचे सत्तेखालीं उणिव कसली ही कधिं नसे॥
अशा त्या राणीचे बहुत उपकारी जग असे॥१५

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- जिच्या पोटीं उत्तम प्रकारची गुणवा-
न् अशीं नऊ मुलें झालीं. परंतु दैवयोगानें सां-
प्रतकालीं जगामध्यें सकलगुण संपन्न अशीं
सात मुलें हयात आहेत. जिच्या अधिकारांत
आम्हां प्रजाजनांना केव्हां कशाचीही कसत-
रता नाहीं. अशा त्या महाराणी साहेबांचें ज-

गावर फार फार उपकार आहेत.

साक्या.

कृपाप्रसादें अतिप्रेमानें दिधला हुद्दा जीणें॥
गव्हर्नर्‌जनरल हिरा चमकतो येई शोभा तेणें॥
कुंठित होय मती ॥ ऐशी धन्य जिची ख्याती॥१६
जशी गळ्यामधिं रत्न-मालिका शोभा देई तेशी॥
गव्हर्नर् आणि गव्हर्नर्‌जनरल शोभति रत्नें खाशी॥
कांती फांके जशी ॥ कीर्ती पसरो तिची तेशी ॥१७
नभीं जसा बौ स्वच्छ चंद्रमा शीतळ छाये तपुनी॥
मनास देई प्रमोद अमुच्या उपकारातें करुनी॥
असती थोर मनें ॥ म्हणुनी नम्र तयां असणें ॥१८
तद्वत् असती राजे आणी जगती रजवाडे ही ॥
बहुत जयांचें प्रेम प्रजेवरि त्यांना आश्रय देई॥
भाग्यो नाहि मिती ॥जगतीं कोण करी गणती ॥१९

त्याहुनि जगतीं थोर धुरंधर मोठी आहे तीतें ॥
सख्या दयाळा राणी अमुची अशिर्वाद दे होतें॥
अमर सुखत्वाचें ॥ मनोरथ पूर्ण करी त्यांचे ॥२०

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- ज्या महाराणीनें कृपेनें व प्रेमानें गव्हर्नर जनरल असा हुद्दा ज्यास दिला तो गव्हर्न्र जन्रल मुगुटावरील हिऱ्याप्रमाणें चमकत आहे. आणि तेणें करून जिच्या राष्ट्राला मोठी शोभा आलेली आहे. आणि त्या योगानें आम्हां प्रजाजनांची बुद्धि कुंठित होत आहे, त्याप्रमाणें महाराणी साहेबांची कीर्ति जगामध्यें धन्य झालेली आहे. ज्याप्रमाणें गळयांत असलेला नवरत्नांचा हार गळ्याला सुशोभित करितो तद्वत् गव्हर्न्र जन्रल साहेब आणि गव्हर्न्र साहेब महाराणी साहेबांच्या गळयांतील रत्नजडित हाराची छानदार रत्नें शोभतात. रत्नांचें तेज आसमंतांत फांकलें जातें, त्याप्रमाणें महाराणी साहेबां-

ची कीर्ति उत्तरोत्तर तिन्ही लोकांत पसरत जावो. बापहो, आकाशमंडळामधील शुभ्र चंद्र आपण आपल्या थंडगार किरणांनीं छाया देऊन आम्हांवर उपकार करून आमच्या मनास परमानंद देतो, ही त्याची कृति थोर आहे. थोरांचीं मनें थोरच असतात, म्हणून थोरांना नम्र असावें. ज्याप्रमाणें त्या परोपकारी चंद्राची कृपा जगावर आहे, त्याप्रमाणेंच ज्यांचे आपल्या प्रजेवर भारी प्रेम आहे असे राजे आणि रजवाडेही ह्या जगांत पुष्कळ असून, त्यांना महाराणी साहेबांचा आश्रय आहे. जिच्या वैभवाला परिमीत नाहीं. म्हणजे जिचें वैभव अगणित आहे. अशा त्या महाराणी साहेबांच्या वैभवाची गणती कोण करणारा आहे? म्हणजे जिच्या वैभवाची गणती कोणाच्याही हातून करवली जाणार नाहीं. वर दर्शविल्याप्रमाणें ज्यांचें आपल्या प्रजेवर अत्यंत प्रेम असून जे चंद्राप्रमाणें परोपकारी आहेत. अशा राजेर-

जवाड्याहूनही थोर असून जी मोठी धूर्त, जि-
चा वरील राजेरजवाड्यांना आश्रय आहे, अ-
शा आणि आम्हां प्रजाजनांच्या सर्व सुखाचा
भांडारखाना ज्या आमच्या कनवाळू पालन
कर्त्या मलिका मा अझमा महाराणी साहेब
व्हिक्टोरिया केसर इ हिंद यांना दयाळू परमेश्व-
रा, तूं आपल्या हातांनीं आशिरवचन देऊन त्यां-
चे सकल मनोरथ परिपूर्ण कर.

भुजंग प्रयात.

मना[3] सज्जना[2] राजभक्ती[4] करीं[5] रे[1] ॥
स्वतांची[8] जरा[7] लाज[10] कांहीं[9] धरीं[11] रे[6] ॥
कदांही[12] क्षणी[13] जाऊं[15] नेदी[16] उगांची[14] ॥
खरा[19] पंथ[20] हा[18] बा[17] नसे[22] वाउगा[21] ची[23] ॥२१

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- रे चांगल्या मना राजभक्ति कर. रेस्व-

त्यांची थोडीशी तरी लज्जा बाळग. केव्हांही एक क्षणभर सुद्धां आपल्या आयुष्याचा काळ फुकट घालवूं नकोस. बा मना हाच खरा मार्ग आहे, निर्फळ जाणारा नाहींच.

आर्या.

अरुणोदयीं[२] उठोनी[३] नमन[४] करोनी[५] ति-
च्या[९] भवालागीं[१०] ॥
जय[७]घोष थोरें[६] करुनी ईश[११]पदीं मागणें[१२]
मना[८] मागीं[१३] ॥२२

(वरील अंक अन्वयाने आहेत.)

अर्थ- हे मना, प्रत्यही सूर्योदया बरोबर उठून परमेश्वरास नमस्कार करून महाराणी साहेबांच्या नांवानें मोठ्यानें जयजयकार करून, महाराणी साहेबांच्या कल्याणाविषयीं परमेश्व-

राचे चरणारविंदीं मागणें माग.

पृथ्वी.

प्रजा[1] अभय[3] नेहमीं[2] भय[4] कधीं[5] मुळींही[6] नसे[7] ॥
प्रजा[8] सुखिंच[10] मानशीं[9] विपुल[11] शांतताही[12] दिसे[13] ॥
स्वबालकेहिता[16] जशी[14] झटतसे[17] सुमाता[15] तरी[21] ॥
झटे[18] म्हणुनि[19] वाटतें[20] हरि[22] रूपा[24] करो[25] ती[23] वरी ॥२३

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- जिची प्रजा सर्वदा निर्भय असते, जिच्या प्रजेच्या मनांत भीति केव्हां ही अगदीं असत नाहीं, जिची प्रजा सुखी असून जिच्या राज्यांत पुष्कळ शांतता आहे, ज्याप्रमाणें आई आपल्या मुलांच्या कल्याणाकरितां झटत असते, त्याप्रमाणें प्रजेच्या कल्याणार्थ राणी साहेब पुष्कळ श्रम घेतात, म्हणून आम्हांला त्यांचें कल्याण असावेंसें वाटतें. ह्या साठीं ईश्वरा,

तूं आमच्या त्या महाराणी साहेबांवर कृपा कर.

पद.

(सुंदर मुख - या चालीवर.)

सद्गुणि तूं सद्विचारि राज्य चालके ॥
प्रविण अवधि पूर्ण ज्ञानि भूमिपालके ॥ध्रु०॥
राज्य करिशी न्यायबळें वशे तुला प्रजा ॥
बहुत भुषण हेंचि सत्य ह्यांतची मजा ॥
सफल करो हेतु सर्व असति मानसीं ॥
म्हणुनि अम्ही प्रार्थितसों बहु दिवानिशीं ॥
देवी धांवे पावे झडकरि ये लवकरि ये
विश्वपालके ॥ सद्गुणि तूं सद्वि० ॥ २४ ॥

(वरील अंक अन्वयाचे आहेत)

अर्थ- हे राज्य चालविणारे राणी, तूं चांगल्या गुणाची, चांगल्या विचाराची, पूर्ण ज्ञान-

प्यारी आणि सर्वांमध्यें निपुण अशी आहेस. हे भूतलावरील लोकांच्या पोषण करणाऱ्या मातें, तूं न्यायानें राज्य करिते आहेस म्हणून तुला तुझी प्रजा राजी झालेली आहे, ह्यामध्यें मजा असून तुला हाच जडावाचा दागिना आहे. हे मातें, तुझ्या अंतःकरणाचे ठिकाणीं जे मनोरथ असतील तें सर्व तुझे मनोरथ पूर्ण कर अशाविषयीं आम्ही सकल प्रजाजन परमेश्वरापाशीं रात्रंदिवस प्रार्थना करीत आहों. हे जगाच्या पालन करणाऱ्या परमेश्वरी देवी, लवकर लवकर धांवत येऊन आमच्या महाराणी साहेबांचे मनोरथ पूर्ण कर.

पद.

(चंद्रकांत रायाची कन्या- या चालीवर.)

मोझि[२] विनंती[३] ऐकं[४] श्रीपती[१] नमिलों[६] चरणांला[५] ॥

कृपा[८] करोनी[९] सदैव[७] रक्षीं[१२] अमुच्या[१०] राणीला[११]॥ध्रु०
बहु[१३] कुटुंबी संतति[१४] संपति[१५] चालवि[१७] राज्याला[१६]॥
जी[१९] राहे[२४] श्री[१८] तवपद[२०] कमलीं[२१] लंदन[२२] ग्रामाला[२३]॥
माता[३०] जैशी[२५] सर्व[२७] सुखाला[२८] कारण[२९] बाळाला[२६]॥
तैशी[३१] अमुची[३२] राणि[३३] धुरंधर[३५] ऐसें[३६] न्यायाला[३४]॥
माझि विनंती ऐ०॥ २५॥

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- ईश्वरा, माझी विनंति ऐक. मी तुझे पायांपत नमस्कार करितों. कृपाकरून नेहमीं आमच्या राणीचें संरक्षण कर. जिच्या कुटुंबांत मुलें बाळें आणि पैसा अडका पुष्कळ असून जी राज्यकर्ती आहे. परमेश्वरा, जी तुझ्या पायापाशीं लंदन नामक गांवांत राहत आहे. ज्याप्रमाणें मुलाला सर्व सुखाला कारण आई आहे, त्याप्रमाणें ही व्हिक्टोरियाराणी आम्हांस असून जी

न्याय करण्याला मोठी चतुर आहे.

पद.

(आरती भुवन सुंदराची-या चालीवर.)

प्रभुजी[२] अयुर्दाय[५] द्याहो[६] ॥
महदैश्वर्य[३] राणिला[४] हो ॥ ध्रु०॥
हर्षे[७] दान[८] धर्म[९] करुनी[१०] ॥
सदोदित[११] ईश[१३] मनीं[१२] आणी[१४] ॥
(चाल) देखुनी[१८] तेज[१७] अति[१६] जीचें[१५] ॥
पाहुनी[२२] रत्न[२१] मुखुटिं[२०] तीचे[१९] ॥
चमकती[२४] नयेन[२३] - होइना[२६] सहन[२५] ॥
असे[२९] बहु[२७] गहन[२८] - खुंटलें[३२] कवन[३१] ॥
कवित्वांचे[३०] ॥ हेतू[३५] पुरवि[३६] सर्व[३४] अमुचे[३३] ॥
प्रभुजी अयुर्दाय द्याहो०॥ २६॥

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- परमेश्वरा, आमच्या महाभाग्यशाली राणी साहेबांना दीर्घायुषी करा. जी राणी आनंदानें दान धर्म करून सर्वदां परमेश्वराचें ध्यान करण्यांत निमग्न झालेली असते. कवि म्हणतो कीं, ज्या तेजःपुंज पुण्यशील राणीचें तेज पाहून, आणि तिच्या मुगुटावरील रत्नाची कांति पाहून माझे डोळे चमकूं लागले. तेज असह्य झालें. पुंढील स्थिति वर्णन करणें दुरापस्त आहे, म्हणून येथें माझी कविता करण्याची मति खुंटली. जिनें आम्हां प्रजाजनांच्या मनांतील सर्व इच्छा तृप्त केल्या आहेत, म्हणून परमेश्वरा, अशा त्या महाराणी साहेबांना दीर्घायुषी करा.

पद.

(मन मोहन बजावत-याचालीवर.)

जी अज्ञ प्रजेला कठिण ताप दे म्हणुनी॥
ज्ञान पानं सुख करवि अम्हां झटुनी ॥ध्रु०॥

अति थोर देशभर जिणें ठेविल्या शाळा ॥
मतिमंद शहाणे करुनि सोडि ती बाळां ॥
डुल्लते मनीं बहु-प्रेमें सूटती नेत्रिं जलधारा ॥
॥चाल॥ दीधलें वचन जाणां- राणिनें ॥
हतिं घेउनी राज्यसूत्र — राणिनें ॥
चालवूं हक्क ऐसें — राणिनें ॥ जाहि-
रनामा प्रसिध्द केला स्वतां सुखें करुनी ॥
जी अज्ञ प्रजेला कठिण ता० ॥ २७ ॥

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- ज्या महाराणीनें प्रजाजनांना अज्ञानापासून अतिशयित त्रास सोसावा लागतो, तो न लागावा म्हणून मोठे परिश्रम घेऊन प्रजेला विद्यामृत प्राशन करण्याचें सुख प्राप्त करून दिलें आहे. ज्या महाराणीनें आपल्या अति विस्तीर्ण राज्यांतील सर्व प्रदेशांत शाळा सुरू ठेऊन अपरबुध्द मुलांना श-

हाणे करून सोडिलें आहे, आणि तेणें करून जी राणी आपल्या अंतःकरणाचे ठिकाणीं मोठ्या आनंदानें डोलत असतांना जिचे नेत्र आनंदाश्रूंनीं भरून जातात. अशा महाराणी साहेबांनी हिंदुस्थानचा राज्यकारभार स्वतः आपल्या हातीं घेऊन वहिवाटीप्रमाणें आमचे आजवर चालत आलेले मामूल हक्क चालवूं असें वचन देऊन जिणें स्वतां मोठ्या सुप्रसन्न मुद्रेनें सर्वांस कळावयाकरितां वरील अर्थाचा जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे.

पद.

(वैशाखमास वासंतिक - या चालीवर.)

त्वन्नाम शस्त्र देहांतक प्रखर पाहुनी ॥
त्वत्सर्व शत्रु कांपति गे थरथरा मनीं ॥
त्वन्नाम इष्ट चिंतति ते सौख्य लाभती ॥
त्वत्कीर्ति गाने गाऊनियां तोष मानिती ॥

सदये[25] जिचें[23] हृदय[24] सुशीले[26] धर्मरक्षिणी[27] ॥
दुष्ट[29] नाशा[30] सुष्ट[31] पाळे[32] करितसे[33] जनीं[28] ॥२८

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- गे महाराणी, तुझें नांव ऐकून कोणी एक शरिराचा नाश करणारे तीक्ष्ण खड्ग पाहून तुझे सर्व शत्रु आपल्या अंतःकरणाचे ठिकाणीं भयानें थरथरा कांपूं लागतात, तुझ्या कीर्तीचें गाणें गाऊन जे लोक संतोष मानतात; आणि तुझे कल्याणाविषयींची चिंता करतात, त्या लोकांनां सुख प्राप्त होते. जिचें अंतःकरण दयाभूत असून जी शांतस्वभावाची व धर्माचें रक्षण करणारी आहे, अशी जी राणी ती जगामध्यें वाईट लोकांचा नाश करून चांगल्या लोकांचें पोषण करिते.

पद.

(उद्धवा शांतवन करजा - या चालीवर.)

साम्राज्य[2] सौख्यमय[1] असतां ॥ त्यागिल त्या[4]

कोण ज्ञाता ॥ २०॥

जें दुःखसागरीं बुडती॥ कानूनें सर्वहि तरती॥
इतबारें वर्तन करिती॥ बा त्यांची होई बढती॥
॥चाल॥ होउनी सत्ये जर कर्मी॥ त्यागुनी निं
द्य धरि नामीं॥ देउनी मार्ग परिणामीं॥
दृष्टी बा बहु सुख चित्ता॥ त्या सूज्ञ प्रजे-
च्या देई॥ राणी ती जी जगमाता॥ सा
म्राज्य सौख्यमय०॥ २१॥

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- सुख कारक राज्य असतांना, त्या राज्याचा कोण शहाणा मनुष्य त्याग करणारा आहे? म्हणजे हें राज्य नको कोण म्हणेल? जे प्राणी दुःखरूपी समुद्रामध्यें बुडाले जातात, म्हणजे ज्यांना दुःख फार होते, ते सर्व प्राणी कायदारूपीं जहाजानें पार पडले जातात. बाप हो, जे-

लोक इमानानें वागतात, त्यांची बढती होते. सत्यत्वानें चालून निंद्य कर्मांचा त्याग करून परिणामावर नजर पुरवून सुमार्गानें वर्तन ठेविलात, त्या सुजाण प्रजाजनांच्या अंतःकरणाला, जी जगन्माता महाराणी व्हिक्टोरिया ती पुष्कळ सुख देते.

पद

(पुरुष न नीच कुणी असला-याचालीवर)

प्रभुंची कीर्ति सदां गाती ॥
त्यों त्यों राजनिष्ट म्हणती ॥ ध्रु०॥
दुःखित प्रभुतें अपुल्या देखुनि ॥
दुःखित जे होती ॥ त्या त्या०॥ ३०
आनंद जेव्हां प्रभुराज्ञीशी ॥
आनंद ते करिती ॥ त्या त्या० ॥ ३१
हुकूम ऐकुनि हुकुमा सरशी ॥

धांवत जे पळती ॥ त्या त्या० ॥ ३२
स्वराजें निष्ठे ऐसें नाहीं पुण्य दुजें ज-
गतीं ॥ म्हणुनी ग्रंथ पहा वदती ॥
प्रभुची कीर्ति सदां० ॥ ३३ ॥

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- जे लोक सदैव आपल्या राजाची कीर्ति गातात, त्यात्या लोकांना राजनिष्ट असें म्हणतात. जे लोक आपल्या राजाला दुःख झालेलें पाहून दुःखित होतात, व जेव्हां आपला प्रभू जी महाराणी तिला आनंद होईल तेव्हां आनंद करितात, आणि जे लोक राणी साहेबांचा हुकूम ऐकून हुकूम सुटतांच धांवत पळत जातात, त्यां त्यां लोकांना राजनिष्ट असें म्हणतात. पहा, जगतांत राजनिष्ठे सारखें दुसरें पुण्य नाहीं, म्हणून मोठ मोठाले ग्रंथ साक्ष

देतात, या साठीं प्रजेनें राजनिष्ठा पाळावी, हें योग्य आहे.

पद.

(देवो हें राज्य सारें - या चालीवर)

महाराणी[४] ज्ञानखाणी[१] सर्वांची[२] स्वामिनी[३]॥
कुरवंडी[७] योग्य[८] आहे[९] पूजाया[६] सुमनीं[५]॥
दैवानें[१२] लाभेली[१३] हीं[१०] सर्वांशी[११] वाटतें[१९]॥
आम्हांते[१५] तोषवाया[१६] अवतरली[१८] मोदतें[१७][१४]॥३४

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- ज्ञानानें भरलेली असून आम्हां सर्वांची स्वामिनी जी महाराणी ती उत्तम प्रकारच्या सुवासिक आणि नाजूकशा पुष्पांनीं पूजन करण्यास व आरती करण्यास (स्त्रियांनीं ओवाळण्यास) योग्य आहे. ही राणी आम्हां सर्वांना दैवयोगानें प्राप्त झालेली असून आ-

म्हां प्रजाजनांना संतुष्ट करण्याकरितां मातोश्री प्रमाणें निर्माण झाली असें वाटतें.

पद.

(राम भजावा-या चालीवर.)

प्रजेवरी[२] जिवप्राण[३] प्रभूचा[१] ॥ अम्हांवरी[४] जि-
वप्राण[५] ॥ ध्रु० ॥ ज्ञानामृत[७] हो[६] प्यार्यांसाठीं[८] ॥
केलिं[११] स्कुलें[९] निर्माण[१०] ॥ प्रभूचा० ॥ ३५ ॥
न्यायोत्तव[१३] जें[१२] दिवाणिखातें[१४] तसेंच[१५] मुल्कि-[१६]
हि जाण[१७] ॥ प्रभूचा अम्हां० ॥ ३६ ॥
मार्ग[१८] दुरुस्ती[१९] सांठिं[२०] सफाई[२१] शासेन[२३] फौज्दा-[२२]
रिं जाण[२४] ॥ प्रभूचा० ॥ ३७ ॥
ईरीगेशन्[२५] असेंच[२६] दुसरें[२७] जंगल[२९] तेंची[२८] जा-[३०]
ण ॥ प्रभूचा अम्हां० ॥ ३८ ॥
कस्टम[३१] आणिक[३२] पलटेण[३३] ऐशीं[३४] खातीं[३५]

केली जाणें ॥ प्रभूचा० ॥ ३९ ॥

पोस्टें देवी ठेविं करुनियां फायद्यांसा-
ठीं जाणें ॥ प्रभूचा० ॥ ४० ॥

रेल्वे आणी तारऑफिसें होतीं सुखक-
र जाण ॥ प्रभूचा० ॥ ४१ ॥

दवाहि पैमाषांदि करुनियां खातीं असें-
तीं जाणें ॥ प्रभूचा० ॥ ४२ ॥

प्रजेवरीजिवप्राण प्रभूचे ॥ अम्हांवरीजिवप्राण ॥

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- महाराणी साहेबांचा आम्हां प्रजा ज-
नांवर जीव कीं प्राण आहे. बापहो, प्रजाजनां-
नीं विद्यारूपीं अमृत प्राशन करावें म्हणून
जिनें शाळा चालू केल्या, निवाडे मिळविण्याकरि-
तां दिवाणी खात्याची (कोर्टांची) योजना झाली,
त्या प्रमाणेंच वसुलाकरितां (हिशेबासाठीं) मु-

लकी खातें, सडकांची वगैरे दुरुस्ति राहण्याक-
रितां इंजिनियर खातें, अपराध्यांस शिक्षा देण्या-
करितां फौजदारी खातें, लोकांना बागाइताची
सोय व्हावी म्हणून ईरीगेशन्, जंगलाची सुधार-
णा करण्यासाठीं जंगल खातें, मिठाच्या सोयी सा-
ठीं कस्टम, स्वस्थता व शांतता राहण्याकरितां प-
लटण, लोकांच्या फायद्याकरितां पोस्ट, देवी, रे-
ल्वे, दवाखाना, आणि पैमाष वगैरे अशा पुष्कळ
खात्यांची स्थापना झाली. यावरून आमच्या म-
हाराणी साहेब यांचा आम्ही सकल प्रजा केव-
ळ प्राणच आहे हें खरें. म्हणून आम्ही राणीसा-
हेबांचे जितके आभार मानावेत तितके थोडेच
आहेत.

कोरस.

(सुंदर मुख – या चालीवर.)

राणी तूं सर्वमान्य दीनपालकें॥

आम्हांवरि प्रेमकरी राज्यचालकें ॥ ध्रु०
बहुत दिवस राणि सदय राहु ये क्षिती ॥
कीर्ति तिची सकल जगीं होऊं वाढती ॥
राज्य असो पुण्यग्रामिं सुचिरकाल हें ॥
अमुच्या मनिच्या वांच्छा पुरवि सकल यशोचि
विपुल मिळवि मिळवि नीति रक्षकें ॥ राणी
तूं सर्वमान्य दी० ॥ ४३ ॥

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)

अर्थ- हे गरीब लोकांचें पोषण करणाऱ्या राज्य चालविणारे राणी, तूं जगांत श्रेष्ठ आहेस, म्हणून तुला विनंति करितों कीं, तुझी प्रीति आम्हांवर असूं दे देवा, या पृथ्वीचे ठिकाणीं दयाळू राणी पुष्कळ दिवस असावी, सर्व जगांत तिची कीर्ति उत्तरोत्तर वाढत जावी, हें राणीचें राज्य पुण्य क्षेत्रांत निरंतर असावें हे नीतीनें रक्षणक-

रणारे राणी, आम्हां प्रजाजनांच्या मनांतील सर्व इच्छा तृप्त कर, आणि पुष्कळ यश संपादन करू न घे.

साक्या.

गोविंदानें[1] अल्पमतीनें[5] पद्यमौलिका[6]
रचिली[7] ॥
हातकणंगलें[2] मौजिं[3] बैसुनी[4] भावें[9] तुज-[8]
ला दिधली[10] ॥
ही[12] तूं[11] घेई[14] करीं[13] - लोभें[15] स्वीकारी[16] ॥ १॥
हे[17] राज्ञी[18] ती[19] तवें[22] कंठीं[23] हीं[20] मौक्तिक-माला[21]
साजो[24] ॥
करो[26] सुशोभित[25] तेणें[27] तुझिया[28] चित्तीं[29] प्र-
मोदें[30] मौजो[31] ॥
शरणागत[33] भारी[34] ॥ ऐशी[32] ओंस[35] करी[36] ॥२॥

(वरील अंक अन्वयाचे आहेत.)


अर्थ– हे महाराणी, म्या गोविंदानें हातकणंलें नामक गांवामध्यें राहून कोत्या बुध्दीनें कविता माला तयार केली, ही तुजला मोठ्या भक्तीनें अर्पण केली आहे. ही माला तूं आपल्या हातांत घेऊन ममतेनें ग्रहण कर. हे राणी, ही कविता माला तुझ्या कंठाचे ठायीं मौक्तिकमालिके प्रमाणें शोभली जावो, आणि या मालिकेंकरून तुला उत्तम प्रकारची शोभा येवो, आणि तेणेंकरून तुझ्या मनाला परमानंद होवो, त्या प्रमाणें मी (शरणांगत) फार फार आशा करीत आहे.

समाप्त.

आभार.



ईश्वरा, मी आरंभिलेला कार्य भाग तुझ्या कृपेनें शेवटास गेला. परंतु आतां आणखी एक मात्र इच्छा राहिली आहे, ती ही कीं, हें अत्युत्तम, नीतिपर पुस्तक विद्याखात्याचे अधिकारी साहेब शाळांनिहाय बक्षिसें वगैरे देण्याकरितां मंजूर करून पुस्तकें घेण्याची मेहेरबानगी करतील इतकेंच मागणें मागून त्वत्पदीं नमस्कार करितों.



टीप- पुस्तकावरील अभिप्राय आणि आश्रयदात्यांचीं नांवें पुढील आवृत्तींत नोंदली जातील.